Vol. 9 I Iss. 42 I Dt : Thursday, 29 January, 2026

जागृत जनमत

# डॉ. जे.जे. मगदूम फार्मसी महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

**जयसिंगपूर/प्रतिनिधी**

शिक्षण ही केवळ पदवी घेण्यापुरती मर्यादित प्रक्रिया नसून ती आयुष्यभर चालणारी साधना आहे. आयुष्यात कधीही शिकणे थांबवू नका; अगदी अखेरच्या श्वासापर्यंत नवीन गोष्टी आत्मसात करत राहा. बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत स्वतःला सतत अद्ययावत ठेवा, कारण सातत्याने शिकणारेच समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. ज्ञानासोबतच मूल्य, नैतिकता आणि माणुसकी जपली, तरच खऱ्या अर्थाने यशस्वी जीवन घडते, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे निबंधक डॉ. अमित शेष यांनी व्यक्त केले. जयसिंगपूर येथील डॉ. जे.जे. मगदूम फार्मसी महाविद्यालयाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात ते मुख्य अतिथी



म्हणून बोलत होते.

यावेळी डॉ. जे.जे. मगदूम ट्रस्टचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील अडमुठे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील, उपप्राचार्य डॉ. सतीश कीलजे, परीक्षा नियंत्रक प्रा. रामलिंग माळी, डॉ. प्रियंका गायकवाड, सौ. एस. वि. मगदुम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांनी सादर केले. यावेळी डॉ. सुनील अडमुठे यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार शिक्षणासोबत संशोधन, कौशल्य विकास आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणावर विशेष भर दिला जात आहे, असे वक्तव्य डॉ. सुनील अडमुठे यांनी केले. तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी जीपॅट, नायपर आणि गेट यांसारख्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढवल्याबद्दल प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांनी आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमात औषधनिर्माण शास्त्रातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांमध्येही विशेष आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम आणि व्हाईस-चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम यांचे मार्गदर्शन आणि शुभेच्छा लाभल्या. प्रा. ऐश्वर्या पाटील यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सौरभ समडोळे, प्रा. प्रणिल तोरसकर, प्रा. शुभम पाटील, प्रा. विनोद पाटील, प्रा. प्रतीक उगारे, प्रा. रोहण लाटवडे, प्रा. स्नेहल पाटील यांनी केले.